18 फेब्रु, 2019. मटा

# राज्यकर्त्यांमुळे शेतकरी देशोधडीला

**कोल्हापूर टाइम्स टीम**

'सध्या शेतकऱ्यांसमोर गंभीर प्रश्न उभे आहेत. शेतकऱ्यांचे प्रश्न केवळ आताचे नसून जुन्या काळापासून ते तसेच पुढे येत राहिले आहेत. त्याचे पर्यावसान साडेतीन लाख शेतकऱ्यांच्या आत्महत्येमध्ये झाले आहे. राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे शेतकरी देशोधडीला लागला आहे,' असे मत खासदार राजू शेट्टी यांनी व्यक्त केले. ताराराणी विद्यापीठाच्या

## कमला कॉलेजमधील चर्चासत्रात खासदार शेट्टी यांची टीका

कमला महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते शनिवारी बोलत होते. डॉ. भारत पाटणकर, गेल ऑम्वेट, भाई संपतराव पवार प्रमुख उपस्थितीत होते.

यावेळी खासदार शेट्टी म्हणाले, 'या परिसंवादातील संशोधनाचा शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी उपयोग होईल. शेतीवर अवलंबून राहणाऱ्यांची संख्या घटत चालली आहे. पर्यायाने देशाच्या एकूण संपत्तीमधील शेतकऱ्याच्या



कमला कॉलेज येथे बोलताना खासदार राजू शेट्टी. व्यासपीठावर डॉ. क्रांतिकुमार पाटील, भारत पाटणकर, गेल ऑम्वेट आदी.

उत्पनाचा हिस्सा घटू लागला आहे. जागतिक बाजारपेठेतील स्पर्धेत आपला शेतकरी टिकाव धरू शकत नाही. तसेच शेतकऱ्याच्या आरोग्य शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जात आहे. विविध योजनांच्या नावाखाली शेतकऱ्याच्या जमिनी काढून घेतल्या जात आहेत. तसेच त्याला श्रमाचा पुरेसा मोबदला दिला जात नाही.'

डॉ. भारत पाटणकर म्हणाले, 'इतिहासामधूनच आपल्या भविष्याची निर्मिती होते. पारंपारिक शेती मागे पडून ग्रीनहाउस ही संकल्पना उदयास येत आहे. सरकारने विंडमिल, सोलर प्रकल्प शेतकऱ्याला नाममात्र किंमतीत दिले पाहिजेत. उर्जेच्या बाबतीत आपण स्वयंपूर्ण झाले पाहिजे. शेतकऱ्याच्या हिताचा विचार व्हावा. पूर्वी स्त्रिया घरामध्ये बी बियाणांची पद्धतशीर साठवण करत होत्या. आता ती पद्धत मागे पडली आहे.'

संपतराव पवार म्हणाले, 'देशातील पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यासाठी पाण्याचे संवर्धन करणे गरजेचे आहे.' स्कॉट कफोरा यांनी मनोगत व्यक्त केले. ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष क्रांतीकुमार पाटील, डॉ. एस. एन. पवार, प्राजक्त पाटील, प्रा. डॉ. नीता धुमाळ, डॉ. सुजय पाटील, प्रभारी प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर, अस्मिता पाटील, वर्षा साठे, उर्मिला कदम, प्रा. अनिल घस्ते, प्रा. नेताजी पोवार उपस्थित होते. प्रा. डॉ. वर्षा केंदगी, डॉ. अनघा पाठक यांनी सूत्रसंचालन केले.